S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing… **Date: 04/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## डावखुरे गोलंदाज बापू नाडकर्णी

क्रिकेटमधील 'कंजूस गोलंदाज' म्हणून ज्यांना ओळखले जाते ते म्हणजे बापू नाडकर्णी. त्यांचा जन्म ४ एप्रिल १९३३ रोजी नाशिक येथे झाला. नाडकर्णी यांनी भारताकडून ४१ कसोटी सामने खेळले आहेत. त्यांनी १९५५ ला न्यूझीलंड विरुद्ध दिल्लीमध्ये कसोटीमध्ये पदार्पण केले होते. तर त्यांनी शेवटचा कसोटी सामना ऑकलॅंडमध्ये न्यूझीलंडविरुद्धच १९६८ मध्ये खेळला होता. विशेष म्हणजे १२ जानेवारी १९६४ ला नाडकर्णी यांनी इंग्लंडविरुद्ध मद्रास (आताचे चेन्नई) येथे कसोटीमध्ये सलग २१ षटके निर्धाव टाकली होती. त्यावेळेस त्यांनी एकूण ३२ षटकांमध्ये २७ षटके निर्धाव टाकत फक्त ५ धावा दिल्या होत्या. सर्वाधिक सलग निर्धाव षटके टाकण्याचा विक्रमही अजून त्यांच्याच नावावर आहे.

नाडकर्णी नेहमीच गोलंदाजी करताना कमीत कमी धावा देण्यासाठी ओळखले जात होते. ते सराव करताना नाणे ठेवून गोलंदाजी करायचे. डावखुरे गोलंदाज असलेले नाडकर्णी केवळ गोलंदाजीच नाही तर फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातही उत्तम होते. त्यांनी इंग्लंडविरुद्ध १९६३-८४ ला झालेल्या कसोटी मालिकेत १२२ धावांची खेळीदेखील केली होती. त्यांच्याबद्दल भारतीय संघाचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी एकदा म्हटले होते की 'बापू अनेक दौऱ्यात सहाय्यक व्यवस्थापक म्हणून संघाबरोबर होते. ते खेळाडूंना प्रेरणा देण्यामध्ये नेहमी पुढे असायचे.' त्यांनी भारतासाठी ४१ कसोटी सामने खेळताना १४१४ धावा केल्या, तर ८८ विकेटदेखील घेतल्या आहेत. त्यांनी मुंबईसाठी १९१ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत. त्यात त्यांनी ५०० विकेट्स घेतल्या आहेत. तर ८८८० धावादेखील केल्या आहेत. नाडकर्णी यांचे १७ जानेवारी २०२० रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 04, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

Jagdamba Education Society's

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401